**नियमित फौजदारी खटला क्र. ५०/२०१७**

**निशाण क्रमांक ४९**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव –** मोहन मारुती पाटील,

**वय–** ६४ वर्षे, **व्यवसाय –** सेवानिवृत्त (पोलीस अधिकारी),

**राहणार –** रत्नागिरी, ता. जिल्हा रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१.** दिनांक १९.१०.२०१६ रोजी मी पोलीस ठाणे संगमेश्वर येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी संगमेश्वर पोलीस ठाण्यात प्रस्तुतचा अपराध क्र. ११०/२०१६ हा कलम ४०६, ४२० भारतीय दंड संहिता अन्वयेच्या गुन्हयाचा तपास माझ्याकडे लेखी आदेशान्वये देण्यात आला. *(साक्षीदारास तपासाचा लेखी आदेश दाखविण्यात आला). तो तोच आहे. त्यावर आमचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. एम. एस. थिटे यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्यासोबत काम केले असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***<u>निशाणी ५०</u>*** *देण्यात आली).*

**०२**. सदर आदेशासोबत मला फिर्यादीचा तक्रारी जबाब व त्याने मा. दिवाणी न्यायालय, रत्नागिरी येथे त्यांनी दाखल केलेला अर्ज व इतर कागदपत्रे देण्यात आली होती. मी त्यांचे अवलोकन केले. त्यानंतर मी मुख्य साक्षीदार – सोमा रत्ना कानसे यांचे तपासटिपण नोंदविले. दिनांक २१/१०/२०१६ रोजी मी साक्षीदार – विनायक सुरेश शिरगावाकर, सुरेश सिताराम शिरगावकर यांचे तपासटिपण नोंदविली. फिर्यादीने बँक ऑफ इंडिया मधुन पैसे पाठविल्याबाबतची कागदपत्रे मी बँकेकडुन मिळण्यासाठी पत्र व्यवहार केला. *(साक्षीदारास जावक क्र. ८६६३/२०१६, दिनांक २०/१०/२०१६ रोजीचे बँक ऑफ इंडिया शाखा प्रंबधक, शाखा–संगमेश्वर, ता.*

*संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ५१** देण्यात आली).* त्यानुसार, सदर शाखेकडुन मला दिनांक ०६/१२/२०१८, १८/१२/२०१८ व १३/०१/२०१५ रोजी भरलेल्या रकमांच्या चलनांची सत्यप्रत प्राप्त झाली होती. ती मी तपासकामी सामील केली आहे. *(सदर कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यास सहा. अभियोक्ता यांनी विनंती केली की, **AIR 2003 AP 251 Gorantta Venkateshwarlu Vs. B. Demudu (para – 8)** यामधील मा. नामदार वरीष्ठ न्यायालयाच्या निरीक्षणानुसार राष्ट्रीयकृत बँकेतील दस्त हे सार्वजनीक दस्त सदरात मोडत असल्याने त्यांना पुराव्यात वाचता येईल. आरोपीचे विधीज्ञ गैरहजर व आरोपी हजर. सदर न्यायनिर्णयाचा संदर्भ व प्रकरणातील दाखल कागदपत्रे ही सत्यप्रती असल्याने त्यास **एकत्रीतपणे निशाणी क्रमांक ५२** देण्यात येते).*

**०३**. *(साक्षीदारास जावक क्र. ८६६४/२०१६, दिनांक २०/१०/२०१६ रोजीचे बँक ऑफ इंडिया शाखा प्रंबधक, शाखा–कसबा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ५३** देण्यात आली).* त्यानुसार, सदर शाखेकडुन मी पत्रात मागविल्यानुसार खाते क्रमांक ५११७ चे दिनांक ०१/१०/२०१५ ते ३१/१०/२०१५ पर्यंतच्या कालावधीमधील खाते उतारा मला प्राप्त झाला. *(साक्षीदारास सदर खाते उतारा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर सदर बँकेची सही व शिक्का आहे. (सदर दस्तास **निशाणी क्र. ५४** देण्यात येते).*

**०४**. *(साक्षीदारास जावक क्र. ८६६५/२०१६, दिनांक २०/१०/२०१६ रोजीचे बँक ऑफ इंडिया शाखा प्रंबधक, शाखा–देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर पोलीस निरीक्षक श्री. एम. एस. थिटे यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्यासोबत काम केले असल्यसाने मी*

*त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **<u>निशाणी ५५</u>** देण्यात आली)*. त्यानुसार, मला पत्रात मागविल्यानुसार संबंधीत खात्यावरील नोंदीचा खाते उतारा व फिर्यादीने भरलेल्या रकमेचे चलन यांची पडताळीत प्रत देण्यात आली होती. *(साक्षीदारास सदर नोंदीचा खाते उतारा व चलन प्रत यांची पडताळी प्रत दाखविण्यात आली). ती तीच आहे. (सदर **<u>दस्तास एकत्रीतपणे निशाणी क्र. ५६</u>** देण्यात येते).*

**०५.** आरोपीचे बँक खाते बँक ऑफ इंडिया, शाखा–कारवांचीवाडी, ता. जि. रत्नागिरी येथे होते. *(साक्षीदारास जावक क्र. ८७०३/२०१६, दिनांक २१/१०/२०१६ रोजीचे बँक ऑफ इंडिया शाखा प्रंबधक, शाखा–कारवांचीवाडी ता. जि. रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर पोलीस निरीक्षक श्री. एम. एस. थिटे यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्यासोबत काम केले असल्यसाने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **<u>निशाणी ५७</u>** देण्यात आली)*. त्यानुसार, मला पत्रात मागविल्यानुसार कागदपत्रे देण्यात आली होती. *(साक्षीदारास खाते क्रमांक ४१४२ चा दिनांक दिनांक ११/१०/२०१४ ते ०४/०६/२०१५ ते पर्यंत च्या खाते उताऱ्याची प्रत दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर बँकेचे सिल व शिक्का आहे. (सदर **<u>दस्तास निशाणी क्र. ५८</u>** देण्यात येते).*

**०६.** आरोपीने एकुण रक्कम रुपये १५,६७२००/– पैकी एकुण रक्कम रुपये १,००,०००/– दिनांक ०५/१०/२०१५, ०७/१०/२०१५, १५/१०/२०१५ व २१/१०/२०१५ रोजी प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/– प्रमाणे फिर्यादीच्या बँक ऑफ इंडिया, शाखा–कसबा, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे चलनाद्वारे भरणा करण्यात आली होती. त्याचे मुळ चलन मिळण्याकरीता मी Oriental Bank of Commerce, शाखा–रत्नागिरी यांना पत्र दिले होते. *(साक्षीदारास जावक क्र. १८०६/२०१७, दिनांक १५/०३/२०१७ रोजीचे*

Oriental Bank of Commerce, शाखा–रत्नागिरी *ता. जि. रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर पोलीस निरीक्षक श्री. एम. एस. थिटे यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्यासोबत काम केले असल्यसाने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ५९** देण्यात आली).* त्यानुसार, मला पत्रात मागविल्यानुसार कागदपत्रे देण्यात आली होती. *(साक्षीदारास दिनांक ०५/१०/२०१५, ०७/१०/२०१५, १५/१०/२०१५ ते २१/१०/२०१५ रोजी भरलेल्या चलनांची सत्यप्रत दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर बँकेचा शिक्का व सत्यप्रत असल्याचा शेरा आहे. (सदर **दस्तास एकत्रीतपणे निशाणी क्र. ६०** देण्यात येते).*

**०७.** *(साक्षीदारास आनंद यशवंत वैर्गुलेकर यांच्या* Oriental Bank of Commerce, शाखा–रत्नागिरी *ता. जि. रत्नागिरी येथे बँक खाते उघडण्याच्या फॉमची व के.वाय.सी.ची पुर्ण कागदपत्रे सत्यप्रत दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर बँकेचा शिक्का व सत्यप्रत असल्याचा शेरा आहे. (सदर **दस्तास एकत्रीतपणे निशाणी क्र. ६१** देण्यात येते).*

**०८.** *(साक्षीदारास आनंद यशवंत वैर्गुलेकर यांच्या* Oriental Bank of Commerce, शाखा–रत्नागिरी *ता. जि. रत्नागिरी येथील बँक खाते क्र. ७११० चा दिनांक ०१/०१/२०१५ ते १६/०३/२०१७ पर्यंतचा खाते उतारा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. (सदर **दस्तास निशाणी क्र. ६२** देण्यात येते).*

**०९.** फिर्यादीने आरोपीविरुध्द मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, रत्नागिरी यांच्याकडे दाखल केलेला दिवाणी दावा क्रमांक ६७/२०१६ ची सत्यप्रत मिळण्यासाठी पत्र दिले होते. *(साक्षीदारास जावक क्र. २९६८/२०१७, दिनांक १०/०५/२०१७ रोजीचे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ रत्नागिरी, जि. रत्नागिरी*

*यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर माझी व पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी ६३*** *देण्यात आली).* त्यानुसार, मला सदर दाव्याची नक्कल प्राप्त झाली. *(साक्षीदारास सदर दाव्याची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली). त्यावर पहिल्या फॉर्मवर माझी स्वीकारणार म्हणुन सही आहे. (सदरचा दस्त सार्वजनीक दस्तऐवज असल्याने सदर दस्तास* ***निशाणी क्र. ६४*** *देण्यात येते).*

**१०.** फिर्यादी व साक्षीदार – सोमा रत्ना कानसे यांनी त्यांचे दागिने बँकेत तारण ठेवुन त्यांच्या रत्नागिरी जिल्हा, मध्यवर्ती बँक, शाखा–फणसवणे, येथील बचत खात्यात जमा झालेली रक्कम रुपये १,२०,५००/– काढुन घेतली होती. त्यातील कागदपत्रांच्या मुळ प्रती मिळण्यासाठी मी सदर बँकेला पत्र दिले होते. *(साक्षीदारास जावक क्र. ८६६६/२०१६, दिनांक २०/१०/२०१६ रोजीचे* रत्नागिरी जिल्हा, मध्यवर्ती बँक, शाखा–फणसवणे *यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर माझी व पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी ६५*** *देण्यात आली).* त्यानुसार, मला पत्रात मागविल्यानुसार कागदपत्रे व त्यासोबत सदर बँकेचे मुळ पत्र देण्यात आले होते. *(साक्षीदारास सदर बँकेचे दिनांक २६/१०/२०१६ रोजीचे जावक क्र. ३२/३९८ चे मुळ पत्र दाखविले). ते तेच असुन त्यावर माझी आवक म्हणुन सही आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्र. ६६*** *देण्यात येते). (साक्षीदारास सदर बँकेकडुन सोने तारण कर्ज मिळण्याकरीता सोमा रत्ना कानसे यांनी केलेल्या अर्जाची सत्यप्रत दाखविण्यात आली). ती तीच असुन शेवटच्या पानावर बँकेचा शिक्का व सत्यप्रत असल्याचा शेरा आहे. (सदरची बँक राष्ट्रीयकृत नसल्याने सदर* ***दस्तास ओळखीकरीता निशाणी क्र. ६७*** *देण्यात येते).*

**११.** दिनांक ०७/११/२०१६ रोजी साक्षीदार – दिपक कृष्णा झिमण यांचे मी तपासटिपण नोंदविले होते. आरोपीने महसुल विभागात शिपाई पदावर नोकरी

लावुन देतो, असे आमिष दाखविल्याने मा. जिल्हाधिकारी यांना पत्र दिले होते. *(साक्षीदारास जावक क्र. २९६९/२०१७, दिनांक १०/०५/२०१७ रोजीचे मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच आहे. त्यावर माझी व पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ६८** देण्यात येते).*

**१२**. तसेच, सदर रक्कम स्वीकारुन आरोपीने जमीनीमध्ये गुंतवणुक केली आहे का याबाबत मी मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना एकत्रीतपणे पत्र दिले होते. त्याचप्रमाणे, फिर्यादीचे १० वी व १२ वीचे उत्तीर्ण प्रमाणपत्र तपासकामी प्राप्त करुन ते मी सामील केले आहे. *(साक्षीदारास विनायक भिकाजी कानसे यांचे १० वीचे गुणपत्रक, १२ वीचे गुणपत्रक व १२ वीचे प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती दाखविण्यात आल्या). त्या त्याच आहेत. (सदर **दस्तास अनुक्रमे निशाणी क्रमांक ६९ ते ७१** देण्यात येते).*

**१३**. आरोपीची आम्ही तपासकामी घर झडती घेतली होती. आरोपी फरार झाला होता. त्याने मा. जिल्हा व सत्र न्यायालय, यांचेकडे अटकपुर्व जामीन अर्ज दाखल केला होता व तो मंजुर झाला होता. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने मी त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**निशाणी क्र. ७२ कडील दाखल मुदतीच्या अर्जान्वये सदर प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.12 18:16:13 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १२.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file evidence are same words as per original Judgment/order/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 12/12/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 12/12/2025 |
| evidence uploaded on | :- | 12/12/2025 |